महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
(CIN NO.U40109MH2005SGC153646)
कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, मंचर.
डी.एस.के. प्राईड, सर्व्हे क्रं.१७०/७ बी, पुणे-नाशिकरस्ता, ग्रामीण आरोग्यकेंद्राजवळ, पो.मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे, पिनकोड-४१०५०३.
☎ - (का) ०२१३३-२२३०४०.
E-mail : ee61a0@mahatransco.in

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

जा.क्र.काअ/अउदा संवसु विभाग/मंचर/मासं/ № 0775 दि. 11 OCT 2024

## आय.टी.आय. इलेक्ट्रिशियन शिकाऊ / प्रशिक्षणार्थी पात्र उमेदवारांसाठी जाहिर सुचना.

ITI(Electrician) उत्तीर्ण उमेदवारांना याद्वारे सुचित करण्यात येते की, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, मंचर कार्यालयामार्फत सन २०२४-२०२५ या कालावधीसाठी शिकाऊ(Apprentice) उमेदवारांना एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करारबध्द करण्यात येणार आहे.

१. एकूण पदांची संख्या :- २४.
२. उमेदवारांनी इयत्ता १०वी उत्तीर्णचे गुणपत्रक (Marksheet) व मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षाचा आयटीआय ( इलेक्ट्रिशियन / वीजतंत्री) परिक्षा उत्तीर्ण केल्याचे सर्व सेमीस्टरचे गुणपत्रक व एकत्रित गुणपत्रक, आधारकार्ड अपलोड करणे आवश्यक आहे.
३. आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र/आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याचे प्रमाणपत्र (EWS) (स्कॅन कॉपी) सादर करणे आवश्यक आहे.
४. कामाचे ठिकाण:- अउदा संवसु विभाग, मंचर अंतर्गत २२० केव्ही उपकेंद्र ब्रिजस्टोन(चाकण)/आळेफाटा/रांजणगांव/-काठापूर/चाकण फेज-२/खेडसिटी तसेच १३२ केव्ही उपकेंद्र व्हर्लपूल(रांजणगांव)/एस.पी.एस.एल./पिंपळगांव/-नारायणगांव/शिरुर/चाकण/ सणसवाडी/कुरुळी/कवठे यमाई.
५. वयोमर्यादा :- वर्ष १८ ते ३० (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम)
६. प्रशिक्षण कालावधीत कंपनी नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
७. अर्जदाराने महाराष्ट्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org या वेबसाईटवर नोंदणी करणे बंधनकारक असून दि.१४.१०.२०२४ ते दि.२४.१०.२०२४या कालावधीत https://apprenticeshipindia.gov.in apprenticeship/-opportunity या लिंकवरून (Estb.code) E01212700050 या अस्थापनेवर आवश्यक माहिती नमूद करून अर्ज सादर करणे अनिवार्य असेल.
८. सर्व अर्जदारांना कळविणेत येते की, दि.०५.११.२०२४ रोजी सर्व मुळ कागदपत्रांसह व २ छायांकित प्रतिसह निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्यावर ठिक सकाळी ११:०० वाजता उपस्थित रहावे.
९. सदर प्रक्रियेमध्ये पुणे जिल्हयामधील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
१०. प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रे अपलोड न केल्यास नोंदणीधारकांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
११. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे महापारेषण कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, मंचर